नियमित फौजदारी खटला नं.११८/२०२२
निशाणी- १८

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- कल्पना भगवान वैराळ
वयः- ६० वर्षे, धंदाः- घरकाम.
राहणार- उरुळी कांचन पुणे.

<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री. के. ए. उबाळे यांचेकडूनः-</u>

१. दि.०७/०९/२०२१ पोलिसांनी मला पंचनामा करण्यासाठी लक्ष्मी नगर येथे बोलाविले होते. घटनास्थळावर माझी आई छबुबाई नेटके ही होती. तेथे पोलीस आले त्यांनी माझी सही घेतली. त्यांनी कशावर सही घेतली हे मला सांगता येत नाही. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीस <u>नि. १९</u> देण्यात येते.

(साक्षीदार सरकार पक्षाला सहाय्य करीत नसल्यामुळे सरकार पक्षाच्या विनंतीवरुन साक्षीदारास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.०७/०९/२०२१ रोजी पोलिसांनी मला शिवाजी नगर, तपोवन रोड येथे अंतर्गत रस्त्यावर पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस तेथे स्वाती सतिष वैराळ हजर होती तिने घटनास्थळ दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा लिहिला.

<u>उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. आर. पी. शेलोत यांचेकडूनः-</u>

३. उलटतपास नाकारला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

CHARATE HAMPE MANISHA

Digitally signed by CHARATE HAMPE MANISHA
DN: cn=CHARATE HAMPE MANISHA, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950843, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.08.20 16:21:09 +0530

(श्रीमती मनिषा द. चराटे-हंपे)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि. २०/०८/२०२५.
अहमदनगर.